**नियमित फौजदारी केस नं. ७०/२०२५**
**नि. क्र. १८**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – पुर्वा महेश डोके,
**वय**– ३३ वर्षे, **व्यवसाय** – गृहिणी,
**राहणार** – मुरादपुर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून–**

**०१.** दिनांक २२/०४/२०२५ रोजी मी माझ्या घरी हजर होते. त्यादिवशी माझी नणंद – श्रध्दा गोंधळी हिचा मला फोन आला होता की, *''माझे काका – आत्माराम भागोजी गोंधळी यांचा मार्लेश्वर फाटा येथे अपघात झाला आहे''.* माझे काकांना रुग्णवाहीकेमधुन नेताना मी तेथे पोहोचले होते. तेथे खुप लोकांची गर्दी जमा झाली होती. त्यावेळी रात्रीचे ०८:०० वाजले असल्यामुळे रस्त्यावर काळोख होता त्यामुळे काही दिसले नाही. त्यानंतर मी माझ्या घरी गेले. माझे काकांना देवरुखच्या रुग्णालयात आणण्यात आले. त्यावेळी त्यांच्यासोबत त्यांचा मुलगा होता.

**०२.** हे मला माहिती नाही की, त्यांना पुढे सी.पी.आर. हॉस्पीटल, कोल्हापुर येथे नेण्यात आले होते, अगर कसे. सदर घटनेची तक्रार आत्माराम गोंधळी यांचा मुलगा – प्रतिक याने दिली होती. पोलीसांनी घरी येवुन माझी एका कागदावर सही घेतली होती. *(साक्षीदाराला तिचा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला.) त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर पोलीसांनी लिहिला असुन तो मी त्यांना सांगितला नव्हता. (सदर जबाबातील साक्षीदाराच्या **स्वाक्षरी पुरत्या भागास निशाणी क्रमांक १९** देण्यात येते).*

*(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)*

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २२/०४/२०२५ रोजी माझे काका आत्माराम गोंधळी हे चालत जात होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी त्यांचा अपघात झाल्याचे मला माझी नणंद श्रध्दा गोंधळी हिने फोनवरुन कळविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी तेथे जावुन पाहिले असता माझे चुलते यांचे दोन्ही पाय व डावा हात फ्रॅक्चर झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी चुलत्यांच्या शरीरावर अन्य ठिकाणी मार लागलेला होता.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी त्यांना रुग्णवाहीकेमध्ये भरत होते. हे मी पाहिले नाही की, तेथे रस्त्यावर रक्त पडलेले होते व एक मोटारसायकल क्र. एमएच–०९–डीपी–७००२ ही रस्त्यालगत पडलेली होती व तिच्या काचा व इतर भाग रस्त्यावर पडलेले होते, अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे मला समजले की, मुरलधीर श्रीधर खेडेकर याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र. एमएच–०९–डीपी–७००२ ही चालवित घेवुन जात असताना माझे चुलते आत्माराम गोंधळी यांना ठोकर देवुन अपघात केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आत्माराम गोंधळी यांना त्यांचा मुलगा व इतरांनी देवरुख रुग्णालयात आणले, पुढे त्यांना रत्नागिरी येथे नेण्यात आले व पुढे त्यांना सी.पी.आर. हॉस्पीटल, कोल्हापुर येथे पाठविण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, सी.पी.आर.हॉस्पीटल, कोल्हापुर येथे त्यांच्यावर उपचार चालु असताना दिनांक २३/०४/२०२५ रोजी माझे चुलते आत्माराम गोंधळी मयत झाले.

**०५.** हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या फिर्यादी जबाबातील मजकुर

माझ्या सांगण्यावरुन नमुद केला होता. साक्षीदार पुढे सांगते की, पोलीसांनीच तो नमुद केला होता, मी त्यांना तो मजकुर सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २५/०४/२०२५ रोजी पोलीस घटनास्थळी पंचनाम्याकरीता आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते.

**०६**. *(साक्षीदाराला प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली). अनुक्रमांक ०२ कडील छायाचित्रात मी हजर असल्याचे दिसुन येत आहे. हे मला माहिती नाही की, अनुक्रमांक ०१ कडील छायाचित्र हे अपघातस्थळाचे आहे, अगर कसे.* हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी तेथे पंचनामा केला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबतचा वाद न्यायालयाबाहेर तडजोड होवुन मिटला आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे</u>**

**<u>यांच्याकडून</u> –**

**०७**. हे म्हणणे खरे आहे की, अपघात मी प्रत्यक्ष पाहिला नसल्याने तो नेमका कोठे, कसा व कोणत्या परीस्थीतीत घडला, याबाबत मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे निश्चीत अपघातस्थळ कोठे आहे, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या चुलत्यांना दारु पिण्याचे व्यसन होते. हे म्हणणे खरे आहे की, मला असे कळाले होते की, त्यादिवशी सुध्दा ते देवरुख येथुन ते दारु प्यायलेले होते व पुढे निघाले होते. हे म्हणणे खरे आहे की, अचानक रस्ता ओलांडत असताना माझ्या चुलत्यांचा अपघात झाल्याचे मला तेथे कळाले होते. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याने माझी आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार उरलेली नाही.

०८. हे म्हणणे खरे नाही की, *तेथे मला समजले की, मुरलधीर श्रीधर खेडेकर याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र. एमएच–०९–डीपी–७००२ ही चालवित घेवुन जात असताना माझे चुलते आत्माराम गोंधळी यांना ठोकर देवुन अपघात केला होता*, हे मी सरतपासात खोटे कथन केले आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.23 17:44:07 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. २३.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date of decision | :- | 23/04/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 23/04/2026 |
| Evidence uploaded on | :- | 23/04/2026 |